# ‘दादा’ अनंतात विलीन...! स्मृती कायम...












## सिटी न्यूज सुपरफास्ट










प्रतिनिधी २९ जानेवारी

**बारामती:**महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर गुरुवारी बारामतीतील विद्या प्रतिष्ठान मैदानावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पार्थ आणि जय पवार यांनी चितेला मुखाग्नी दिला. तेव्हा उपस्थित असलेल्या हजारो समर्थकांचे आणि कार्यकर्त्यांचे डोळे पाणावले होते. पत्नी सुनेत्रा पवार यांनी पतीच्या पार्थिवावर गंगाजल अर्पण करून अंतिम निरोप दिला. यावेळी शरद पवार, सुप्रिया सुळे, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह देशभरातील विविध पक्षांचे नेते उपस्थित होते. महाराष्ट्रासह इतर राज्यांतील लोकही अजित पवारांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित होते. अंत्ययात्रा एक ते दोन किलोमीटरपर्यंत पसरली. महाराष्ट्र पोलिस दलातर्फे हवेत फैरी झाडून आणि बिगुल वाजवून अजित पवारांना अखेरची मानवंदना देण्यात आली. बारामती येथे बुधवारी सकाळी ८.४६ वाजता झालेल्या भीषण विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार (६६ वर्षे ६ महिने ६ दिवस) यांचे निधन झाले.















सिटी न्यूज अमरावती
गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## खतांची अवैध विक्री करणाऱ्या कृषी केंद्र चालकांवर कारवाई; २ केंद्रांचे परवाने रद्द, तर २१ निलंबित

**अमरावती:** जिल्ह्यातील कृषी विक्री केंद्रांकडून होणारी खतांची साठेबाजी, जादा दराने विक्री आणि खतांसोबत इतर निविष्ठांची सक्ती (लिंकींग) करणाऱ्यांविरुद्ध कृषी विभागाने कडक पावले उचलली आहेत. खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी जिल्ह्यातील दोन कृषी निविष्ठा विक्री केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले असून, २१ केंद्रांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण खते योग्य दरात उपलब्ध व्हावीत, यासाठी जिल्हास्तरावर विशेष भरारी पथके स्थापन करण्यात आली असून, तालुका स्तरावर १४ कृषी अधिकारी (खत नियंत्रण) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जर एखाद्या केंद्रावर एमआरपीपेक्षा जास्त दराने खत विक्री होत असेल, साठा असूनही खत नाकारले जात असेल किंवा बोगस खतांची विक्री होत असेल, तर शेतकऱ्यांनी घाबरून न जाता तक्रार करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# शिवर चौफुलीवर ग्रामस्थांचे आमरण उपोषण

### ◆ धामोडी-शिवर ते हिंगणी रस्त्यांच्या डाबकीरणाची मागणी

प्रतिनिधी २९ जानेवारी



**दर्यापूर :** दुर्लक्षीत असलेल्या धामोडी-शिवर ते हिंगणी या रस्त्यांच्या तातडीने डांबरीकरण करण्यासाठी कुंभकर्णी प्रशासनाचे लंक्ष वेधण्यासाठी रोहन डिक्कर व राहुल वाघमारे व शिवर,नागमोडी तेथील ग्रामस्थ शिवर रोड चौफुलीवर मंगळवार पासून आमरण उपोषणाला बसलेले आहेत दर्यापूर ते शिवर, शिवर ते धामोडी तसेच शिवर ते हिंगणी या खडतर व खड्डेमय रस्त्यांच्या डांबरीकरणाची मागणी करत प्रशासकीय कार्यालये आणी लोक प्रतिनिधीनींना अनेकदा साकडे घालत, निवेदने व विनंती केली आहे.मात्र आजवर प्रत्येक अधिकारी आणी लोक प्रतिनिधिनी ग्रामस्थांना वाऱ्यावर सोडत रस्त्यांच्या मागणीला केराची टोपली दाखवली आहे. आता मात्र रस्त्याच्या भीषण दुरावस्थेमूळे शाळकरी विद्यार्थी, वयोवृद्ध ग्रामस्थांना अतोनात अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. तसेच शेती करणेच कठीण झाले असून शेतीला मशागत करताना लागणारे खते, किटकनाशक फवारणी, आदी कामे करताना चिखल तुडवत तारेवरची कसरत शेतकऱ्यांना करावी लागते. तसेच मशागतीला उशीर झाल्यास पीक नुकसान व इतर गावाच्या तुलनेत कमी उत्पन्न, यामुळे कर्जाचा बोजा आदी अडचणीमुळे शेतकरी व ग्रामस्थ वैतागले आहेत. सदर रस्ते जील्हा परिषद व रस्त्याचा थोडा भाग हा नगर परिषद हद्दीत येतो. शासन स्तरावरून वेगवेगळ्या योजनेतून मोठमोठे विकास निधी तालुक्याला मिळत असतो. त्यातून विकासही होतो. मात्र धामोडी-शिवर ते हिंगणीच्या खडतर व अत्यंत खड्डेमय असलेल्या रस्त्यांचा सर्वांनाच विसर कसा पडतो ? हे एक मोठे कोडेच झाले आहे. दिवसभरात काही राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी भेट देऊन उपोषणास पाठींबा दिला आहे. तर दुसरीकडे वृतलिहेस्तोवर प्रशासनातील कोणत्याही अधीकाऱ्यांनी उपोषणाला भेट दिली नव्हती.

# मेलघाटमध्ये वाघ-मानव संघर्षाने आणखी एक जीव घेतला

### ◆ दोन निष्पाप मुलांसमोर वडिलांना वाघाने ओढून नेले

प्रतिनिधी २९ जानेवारी

**धारणी:** मेलघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत सुसर्दा वनपरिक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात आणखी एका नागरिकाचा बळी गेला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. आता मेलघाटवासीय प्रश्न विचारत आहेत की, वाघाच्या हल्ल्यात आणखी किती जीव जातील? मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी सुसर्दा वनपरिक्षेत्रातील पूर्व हिराबंबई बीटच्या वनखंड क्रमांक ११७३ मध्ये ही हृदयद्रावक घटना घडली. हिराबंबई येथील रहिवासी सीताराम बंसीलाल गुथर्या (४०) यांचा बैल गेल्या दोन-तीन दिवसांपासून बेपत्ता होता.

दोन निष्पाप मुलांसमोर..... बैल घरी न परतल्याने चिंतित सीताराम आपल्या दोन अल्पवयीन मुलांसोबत - उमेश गुर्या (इयत्ता ८ वी) आणि महेश गुर्या (इयत्ता ७ वी) - बैलाच्या शोधात जंगलात गेले होते. यावेळी दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक हल्ला केला आणि सीताराम गुथर्यावर प्राणघातक हल्ला करून त्याला ओढत दाट जंगलात नेले. वडिलांवर हल्ला होताना पाहून दोन्ही मुले जीव वाचवून गावाकडे पळाली आणि कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली, ज्यामुळे गावात खळबळ उडाली. माहिती मिळताच वनविभाग, पोलीस प्रशासन तसेच मेलघाट क्षेत्राचे माजी आमदार राजकुमार पटेल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रोहित पटेल आणि सामाजिक कार्यकर्ते वहीद खान घटनास्थळी पोहोचले. सुसर्दा वनपरिक्षेत्र अधिकारी अंजना बनसोड, पोलीस निरीक्षक अवतारसिंह चव्हाण, पीएसआय सतीश झालटे यांच्यासह वन व पोलीस विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. माजी आमदार राजकुमार पटेल यांच्या मदतीने मृतदेह शवविच्छेदनासाठी धारणी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. घटनेनंतर मृताच्या कुटुंबीयांनी आणि ग्रामस्थांनी वनविभागा विरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

> वाघाला पकडा हिराबंबई परिसरात वाघाच्या हल्ल्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती मिळताच मी घटनास्थळी पोहोचलो. सततच्या घटनांमुळे टायगर प्रोजेक्टविरोधात संताप आहे. मृत कुटुंबाला २५ लाख रुपयांची मदत आणि वाघाला पकडण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे.
>
> - राजकुमार पटेल, माजी आमदार, मेलघाट

# भरधाव कारची समोरासमोर धडक; सायट येथे भीषण अपघातात चौघांचा मृत्यू, एक गंभीर जखमी

प्रतिनिधी २९ जानेवारी

**अमरावती :** भातकुली तालुक्यातील सायट येथे बुधवारी रात्री दहाच्या सुमारास भीषण रस्ते अपघात झाला. अमरावती-दर्यापूर मार्गावर भरधाव वेगात येणाऱ्या दोन कारची समोरासमोर धडक होऊन या अपघातात चौघांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

या अपघातात मुकुंद काळे (५०, यशोदनगर अमरावती), गोपाल राजपुरोहित (२८, रा. भातकुली), प्रेम बिश्नोई (रा. जोधपूर, राजस्थान) व जुनेद यांचा समावेश असल्याची माहिती जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. जुनेद व मुकुंद काळे हे एका कारमध्ये होते. त्यापैकी जुनेद हा कार चालवत असल्याचे समोर आले आहे.

समोरून आलेल्या भरधाव कारशी जोरदार धडक झाल्याने दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. या भीषण धडकेत दोन्ही कारमधील चौघे जण जागीच गंभीर जखमी झाले. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवले. मात्र उपचारादरम्यान चौघांचा मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच भातकुली पोलिस ठाण्याचे ठाणेदार राजू राजुलवार व त्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून अपघाताची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून मृतांच्या नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# विद्यानिकेतनचा सहा महिन्यांत कायापालट करणार - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

प्रतिनिधी २९ जानेवारी

### ◆ शासकीय विद्यानिकेतनला सदिच्छा भेट



**अमरावती :** महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त दि. २६ जानेवारी रोजी शासकीय विद्यानिकेतन, अमरावती येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यानिकेतन अंतर्गत असलेल्या वस्तीगृह शाळांची पाहणी करून तेथील शैक्षणिक, निवासी व भौतिक सुविधांचा आढावा घेतला.

शासकीय विद्यानिकेतन ही संस्था १९६७ पासून कार्यरत वसतीगृह असून राज्य शासनाच्या अखत्यारितील निवासी शाळा आहे, येथे प्रज्ञाशोध परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या संस्थेत प्रवेश दिला जातो. या शाळांच्या विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी मंत्री महोदयांनी यापूर्वी मंत्रालय स्तरावर विविध बैठकांचे आयोजन करून प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी प्रत्यक्ष विद्यानिकेतनला भेट देऊन पाहणी केली.

मार्गदर्शन करताना मंत्री भुसे म्हणाले, ङ्खराज्यातील पाच शासकीय विद्यानिकेतन या महाराष्ट्र शासनाच्या शाळा असून त्यांचे पालकत्व थेट राज्य शासनाकडे आहे. आगामी सहा महिन्यांत विद्यानिकेतनचा सर्वांगीण कायापालट करण्याचे उद्दिष्ट आमच्या डोळ्यांसमोर आहे. या शाळांना पुन्हा एकदा वैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन व प्रशासन पूर्ण ताकदीने कार्यरत आहे.

या कार्यक्रमास अमरावती विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष संदीप संघवे, शिक्षण उपसंचालक (अमरावती विभाग) निलिमा टाके, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. अमरावती प्रिया देशमुख, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मुघल, शिक्षण निरीक्षक मनवर, प्रभारी प्राचार्य तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) मानकर, उपशिक्षणाधिकारी इम्रान, माजी प्राचार्य नरेंद्र गायकवाड, अधीक्षक श्रीमती निलिमा सोलंके, प्रभारी गृहप्रमुख दिनेश सोनोने, शिक्षक मोहम्मद आफाक, माजी विद्यार्थी प्रभाकरदादा वाघमारे, गावंडे, निस्ताने तसेच शासकीय विद्यानिकेतन येथील सर्व शिक्षक व कर्मचारी आणि विद्यानिकेतनला सेवा देणारे शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेतीची अवैध वाहतूक; टिप्पर जप्त

**खामगाव :** शहरातील तायडे कॉलनी परिसरात रेतीची अवैध वाहतूक करताना टिप्पर महसूल विभागाच्या पथकाने जप्त केला. ही कारवाई नायब तहसीलदार निखिल पाटील यांच्या पथकाने केली. या टिप्पर चालकाकडे रेती वाहतुकीचा परवाना आढळला नाही. विशेष म्हणजे, रात्री उशिरा सुरू झालेली ही कारवाई पूर्ण करून सकाळी ३.३५ वाजता टिप्पर तहसील कार्यालयात जमा करण्यात आला. टिप्पर चालकाविरुद्ध दंड आकारण्याची कारवाई सुरू आहे.या कारवाईत ग्राम महसूल अधिकारी अमित अमृतकर, आनंद वानखडे, कार्तिक जाधव, वल्लभ फिरके, दीपक खोडके व सुमित गवई यांनी सहभाग घेतला.

# अपहरण झालेल्या मुलाचा मृतदेह पूर्णा नदीपात्रात आढळला!

प्रतिनिधी २९ जानेवारी

### ◆ वाघोळा येथील घटना

**खामगाव :** मलकापूर तालुक्यातील वाघोळा येथून अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलाचा मृतदेह पूर्णा नदीपात्रात आढळल्याची घटना दि. २७ जानेवारीला उघडकीस आली. प्रजासत्ताक दिनी बेपत्ता झालेल्या या मुलाचा मृतदेह सापडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वाघोळा येथील रहिवासी सचिन कड्डू कांडेलकर (वय ५०) यांचा मुलगा श्याम सुनील कांडेलकर (वय १७) हा २६ जानेवारीला घरातून बाहेर पडल्यापासून बेपत्ता होता. नातेवाइक व ग्रामस्थांनी सर्वत्र शोध घेऊनही तो न सापडल्याने कांडेलकर यांनी मलकापूर एमआयडीसी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी भा.न्या.सं. २०२३ चे कलम १३७ (२) अन्वये अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता.तपास सुरू असतानाच २७ जानेवारी रोजी पूर्णा नदीपात्रात एका तरुणाचा मृतदेह दिसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. घटनास्थळी पोलिस पथकाने धाव घेतली असता मृतदेह श्याम कांडेलकर याचा असल्याचे समोर आले.त्यानंतर पंचनामा करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली.पूर्णा नदीच्या काठावर श्यामची चप्पल आढळून आल्याने ठाणेदार नरेंद्र पेंदोर यांना संशय बळावला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बुलढाणा येथील आपत्ती व्यवस्थापन पथक, ओमसाई फाउंडेशन, नांदुरा येथील शोधपथक तसेच ग्रामस्थांच्या मदतीने नदीपात्रात शोधमोहीम राबविण्यात आली. अखेर शोधकार्यादरम्यान श्यामचा मृतदेह नदीपात्रात आढळून आला.या शोधकार्यात ओमसाई फाउंडेशनचे विलास निंबोळकर व त्यांचे सहकारी, पोलिस कर्मचारी प्रदीप सोनवणे, अमोल वानी, संदीप पाटील, मनोज कापसे, अंकुश बोबडे, नीलकंठ कुंडकर, गुलाबसिंग राजपूत, गोविंदा मुंडाले यांनी महत्त्वाचे सहकार्य केले. यावेळी तहसीलदार समाधान सोनवणे, प्रशांत गवई आणि कविता चव्हाण उपस्थित होते.

# महाराष्ट्रात सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ

### ◆ कमांड अँड कंट्रोल सेंटरला दररोज ७ हजारांहून अधिक कॉल

प्रतिनिधी २९ जानेवारी




**अमरावती :** राज्यात सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस चिंताजनक वाढ होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. ऑनलाइन फसवणूक, बनावट कॉल, लिंकद्वारे फसवणूक, डिजिटल अटक, हॅकिंग, बनावट प्रोफाइल, सायबर बुलिंग, स्टॉकिंग, फिशिंग, मालवेअर, सेक्सटॉर्शन, एपीके फाईल्स तसेच ई-चलान फसवणूक अशा विविध प्रकारच्या सायबर गुन्ह्यांनी नागरिक हैराण झाले आहेत. या वाढत्या घटनांचा थेट परिणाम महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाच्या 'कमांड अँड कंट्रोल सेंटर'वर होत असून येथे दररोज तब्बल ७,००० पेक्षा अधिक तक्रारी व कॉल प्राप्त होत आहेत.

राज्यातील सायबर फसवणूक गुन्ह्यांच्या प्रमाणात कमालीची वाढ झाली आहे. 'महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पा'च्या कमांड अँड कंट्रोल सेंटरला मिळणाऱ्या तक्रारींची संख्या ही प्रकल्पाच्या सुरुवातीला अपेक्षित असलेल्या क्षमतेपेक्षा कित्येक पटीने अधिक असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे हेल्पलाईन यंत्रणेवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे.

सायबर गुन्हेगारांकडून दररोज नव्या-नव्या पद्धतीने नागरिकांना गंडा घातला जात आहे. कधी केवायसी अपडेटच्या नावाखाली, तर कधी कस्टमर केअर असल्याचे भासवून नागरिकांना बनावट कॉल केले जात आहेत. काही वेळा ओटीपी, एपीके फाईल्स किंवा संशयास्पद लिंक पाठवून नागरिकांच्या बँक खात्यांमधील रक्कम लंपास केली जात आहे. डिजिटल अटक, रोअर फ्रॉड, बनावट प्रोफाइलद्वारे ब्लॅकमेलिंग, सेक्सटॉर्शनसारख्या गंभीर प्रकारांमुळे अनेक नागरिक मानसिक तणावाखाली सापडत आहेत. ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे सायबर हेल्पलाईनवर तक्रारींचा अक्षरशः पूर आला आहे. या तातडीच्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी गृह विभागाने काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येत आहे. नागरिकांनी फसवणूक झाल्यास तात्काळ अधिकृत सायबर हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, अनेक नागरिक फसवणूक झाल्यानंतर उशिरा तक्रार दाखल करतात. त्यामुळे गुन्हेगारांचा शोध घेणे कठीण होते. सायबर तज्ज्ञांच्या मते, फसवणूक होताच तात्काळ तक्रार नोंदवल्यास आर्थिक नुकसान थांबवणे किंवा काही प्रमाणात रक्कम परत मिळवणे शक्य होते. मात्र, जनजागृतीच्या अभावामुळे अजूनही अनेक नागरिक अशा गुन्ह्यांची माहिती वेळेत देत नाहीत.

राज्यात वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करणे ही काळाची गरज बनली आहे.

# तोंगलाबाद येथे ३० जानेवारीला सांज आठवांची बहारदार कार्यक्रम

प्रतिनिधी २९ जानेवारी

### ◆ राष्ट्रीय विद्यालयाचा माजी विद्यार्थी मेळावा निमित्त आयोजन

**दर्यापूर :** तालुक्यातील तोंगलाबाद येथील राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे माजी विद्यार्थी संघाच्या वतीने २९ व ३० जानेवारी रोजी भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. २९ जानेवारी रोजी माजी विद्यार्थी मेळाव्याचे उद्घाटन समारंभ व आठवांचा स्मृतीगंध या स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा सकाळी ११ वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.तर दुपारच्या सत्रात २ वाजता माजी विद्यार्थी परिसंवाद, चर्चासत्र, मनोगत कार्यक्रम संपन्न होणार आहे. या उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली देऊन होणार आहे. म्या दुर्दैवी घटनेमुळे राज्यात तीन दिवस दुखवटा असल्याने या मेळाव्यात होणारा मराठी हास्य कलाकार यांचा गीत, संगीत, नृत्य, विनोद, काव्य व निवेदन यांची सांगड घालणारा 'सांज आठवांची' हा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम २९ ऐवजी ३० जानेवारी रोजी संध्याकाळी ७ वाजता आयोजित केला आहे.

यामध्ये रंगभूमीवरील सुप्रसिद्ध हास्य कलाकार भारत गणेशपुरे, गौरव मोरे, तसेच अभिनेत्री हेमांगी कवी आणि अंकुर वाढवे यांच्या अदाकारीचा आस्वाद प्रेक्षकांना घेता येणार आहे. तसेच ३० जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात सकाळी ७ वाजता प्रभात फेरी,ग्रंथ दिंडी व ग्राम स्वच्छता कार्यक्रम होईल. सकाळी १० वाजता गुरुवंदना व ऋण परीस्पर्शाचे हा गुरुंचा सन्मान कार्यक्रम साजरा होईल. दुपारी १२ वाजता माजी विद्यार्थी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम व माजी विद्यार्थी सभागृह व व्यायाम शाळा भूमिपूजन संपन्न होणार आहे.



# अजितदादांच्या अकाली निधनाबद्दल मान्यवरांच्या शोकसंवेदना..

### एक खमक्या राजकारणी हरपला.



“ उपमुख्यमंत्री मा.अजितदादा पवार यांच्या अकास्मिक व दुःखद निधनामुळे एक खमक्या राजकारणी हरपला, महाराष्ट्राची ही फार मोठी राजकीय हानी आहे, या शब्दात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख यांनी आपला शोक व्यक्त केला. मा.अजितदादा सोबत आपण पक्षात व मंत्रिमंडळात काम केले आहे. कै.सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात आम्ही दोघेही राज्यमंत्री होतो. त्यांची प्रशासन व राजकारणावर चांगली पकड होती. एक लढवय्ये नेतृत्व, कुशल प्रशासक आणि दूरदृष्टीचा नेता महाराष्ट्राने गमावला आहे, असे सांगून हर्षवर्धन देशमुख यांनी मा.अजितदादांना श्रद्धांजली अर्पण केली.

**हर्षवर्धन देशमुख**
अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

### राज्याच्या राजकारणात कधी न भरून निघणारी पोकळी



“ अतिशय स्पष्टवक्तेपणा, निर्णयांवरील ठामपणा आणि निर्भीड नेतृत्व ही त्यांची प्रमुख ओळख होती. कष्टाळू, अभ्यासू आणि कार्यक्षम प्रशासक म्हणून त्यांनी आपल्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. शेतकरी, कामगार, युवक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी त्यांनी नेहमीच आक्रमक व प्रभावी भूमिका घेतली. परिस्थिती कितीही कठीण असो, निर्णय घेण्याचे धाडस आणि जबाबदारी स्वीकारण्याची वृत्ती त्यांच्या नेतृत्वात दिसून येत होती. सामान्य माणसाच्या हितासाठी घेतलेले निर्णय, विकासाभिमुख दृष्टीकोन आणि स्पष्ट कार्यशैली कायम स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक अनुभवी, दूरदर्शी आणि प्रभावी नेता गमावला असून ही हानी राज्यासाठी अपूरणीय आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

**सुनील खराटे**
भाजप, अमरावती



“ महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकस्मात निधनाची खबर अत्यंत हृदयदाहक आणि दुःखद आहे.आज सकाळी बारामती येथे झालेल्या विमान दुर्घटनेत त्यांच्यासह इतर सहप्रवाशांचाही मृत्यू झाला.अजितदादांसारखे मजबूत,विकासाभिमुख आणि जनसंपर्क असलेले नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात दुर्मिळ होते. त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी,विशेषतः ग्रामीण भागातील सिंचन, सहकार आणि पायाभूत सुविधांसाठी दिलेल्या योगदानामुळे ते जनतेच्या मनात कायम राहतील.अजितदादा यांचा राजकीय प्रवास हा संघर्ष, दूरदृष्टी आणि निर्धाराचा होता. त्यांच्या अचानक जाण्याने महाराष्ट्राला अपूरणीय हानी झाली आहे.आज जेव्हा राज्याला त्यांच्यासारख्या अनुभवी आणि निर्णायक नेतृत्वाची अधिक गरज होती, तेव्हा हे नुकसान अधिकच जाणवते.त्यांच्या आत्म्यास शांती लाभो आणि शोकाकुल कुटुंबीयांना, त्यांच्या लाखो समर्थकांना आणि संपूर्ण महाराष्ट्राला या दुःखातून बळ मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**बबलु शेखावत**
अध्यक्ष, अमरावती शहर कॉंग्रेस कमिटी

### जनहितासाठी आयुष्य वाहून घेतलेला नेता हरपला



“ एका अनुभवी, दूरदृष्टी असलेल्या आणि जनहितासाठी आयुष्य वाहून घेतलेल्या माननीय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या दुःखद निधनाने राज्याच्या राजकीय, सामाजिक व सार्वजनिक जीवनात न मोजता येईल अशी पोकळी निर्माण झाली आहे. लोकशाही मूल्ये, प्रशासनातील समतोल आणि जनतेच्या प्रश्नांबाबत त्यांची ठाम भूमिका सदैव स्मरणात राहील. सार्वजनिक जीवनात त्यांनी दाखवलेली निष्ठा, नेतृत्वगुण आणि लोकसेवेची तळमळ पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. ईश्वर माननीय अजित दादा पवार यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना आणि असंख्य समर्थकांना या कठीण प्रसंगी दुःख सहन करण्याचे बळ देवो, हीच प्रार्थना. भावपूर्ण श्रद्धांजली.

**प्रा. डॉ.हेमंत देशमुख**
शहर जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष अमरावती

### दादांना भावपूर्ण श्रद्धांजली



“ महाराष्ट्राचा कानाकोपरा जाणणारा सर्वसामान्यांचा नेता आज आपल्यातून निघून गेला. बेधडक स्वभावाचे अजित दादा या राज्याचे भूषण होते पत्रकार म्हणून पत्रकारांच्या समस्यांबाबत दादांसोबत तीन वेळा सुसंवाद घडला तेव्हा वरून कठोर वाटणारे दादा किती सौम्य आहेत हे कळले. प्रत्येक क्षेत्रात विशेषतः मंत्रालयातल्या सर्वच खात्याची खडा न खडा माहिती असणारा हा माणूस कार्यकर्त्यांना जीव लावणारा होता. दादांना विनम्र श्रद्धांजली.

**दिलीप एडतकर**
सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २०२ ■ गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## अकोल्याला मिळणार उद्या ९ वा महापौर

**महापौरपदी शारदा खेडकर तर उपमहापौरपदी अमोल गोगे यांची निवड निश्चित**

**अकोला :** महापालिका सभागृहात शुक्रवारी सकाळी नववे महापौर, उपमहापौर निवडीसाठी विशेष सभा होणार आहे. शहर सुधार आघाडीकडून शारदा रणजित खेडकर तर उपमहापौरपदासाठी अमोल गोगे यांनी नामांकन दाखल केले आहे. तर महाविकास आघाडीकडून सुरेखा मंगेश काळे यांनी महापौर पदासाठी तर आझाद खान अलियार खान यांनी उपमहापौर पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

महापालिकेतील प्रशासकीय राजवट संपून शुक्रवार पासून सूत्र नवनिर्वाचित पदाधिकारी यांच्याकडे जाणार आहेत. भारतीय जनता पक्ष, दोन्ही राष्ट्रवादी, महानगर विकास समिती मिळून शहर सुधार समिती स्थापन केली आहे. समितीचे ४४ सदस्य आहेत. तसेच विभागीय आयुक्तांकडे समितीची रितसर नोंदणी, ओळख परेड देखील झाली आहे. त्यामुळे शहर सुधार समितीचे महापौर, उपमहापौर होणार याविषयी शंका राहिलेली नाही.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त रक्तदान शिबिरात १०५ युनिट रक्त जमा झाल



अकोला: ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभ मंगल हॉलमध्ये बसंत अ‍ॅग्रो टेक इंडिया लिमिटेड, जेपीएस किया स्टोअर, न्यूट्रिपॉप, सिंग दा ढाबा, लेव्हल-अप, फिटनेस अ‍ॅली आणि अकोला ब्लड बँकेच्या सहकार्याने जेसीआय अकोला यंगिस्तान ने आयोजित केलेले महा रक्तदान शिबिराचे सोमवारी २६ जानेवारी २०२६ रोजी समारोप झाले. एकदिवसीय शिबिरात ११ महिलांसह १०५ नागरिकांनी रक्तदान केले.

## अनोळखी मृत व्यक्तीची ओळख पटवण्याचे आवाहन

**अकोला:** डाबकी रोड पोलिस स्टेशन अंतर्गत अनोळखी मृत व्यक्तीची ओळख पटवण्याचे आवाहन डाबकी रोड पोलिसांनी केले आहे. मृत व्यक्ती ४० ते ४५ वयोगटातील आहे. शरीर बांधा मध्यम, उंची ५ फूट ५ इंच, अंगात लालसर रंगाचा टी शर्ट असून त्यावर कॉटन कँडी ऑथेन्टीक असे लिहिले आहे. पँट पांढरी भुरकट जीन्स परिधान केली आहे अशा वर्णनाच्या व्यक्ती विषयी माहिती असल्यास डाबकी रोड पोलिस स्टेशनमध्ये ०७२४२४ ४५३४० तसेच सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक विजय बासंबे यांच्याशी ९१३०९०८९२९ क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## संत तुकाराम महाराज जयंती निमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**तेल्हारा:** जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या जयंतीनिमित्त तेल्हारा येथील श्री. संत तुकाराम महाराज चौकात विविध समाजोपयोगी व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन आगामी २ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले आहेत. जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमांतर्गत स्वच्छता अभियान, महाआरती, मतदान शिबिर, भक्ती संध्या, किर्तन व सत्कार अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कीर्तनाचे व्यासपीठ नेतृत्व हभप कु. शिवलीलाताई पाटील (बार्शी सोलापूर) करणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन कुणबी समाज संघटना व कुणबी महिला संघटना तेल्हारा शहर व तालुक्याच्या वतीने करण्यात आले.

## 'हारे के सहारे' च्या जयघोषात श्यामबाबांची भव्य निशान यात्रा

प्रतिनिधी २९ जानेवारी

**अकोला:** गीतानगर परिसरातील श्री श्याम बाबा व रामदेव बाबा मंदिरात माघ शुक्ल पक्ष एकादशीच्या पावन तिथीनिमित्त विविध धार्मिक अनुष्ठानांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने शेकडो श्यामप्रेमी भक्तांच्या उपस्थितीत सकाळी ७ वाजता राणी सती धाम मंदिर येथून भव्य निशान यात्रा काढण्यात आली.

सकल मारवाडी समाजाचे आराध्य दैवत आणि भक्तांचे दुःख दूर करणारे 'हारे के सहारे' श्री श्याम बाबा यांचा माघ शुक्ल पक्ष एकादशी उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावात साजरा करण्यात येत आहे. उत्सवानिमित्त सकाळी ६ वाजता श्री श्याम प्रभूंची विधीवत पूजा-अर्चा करून आकर्षक शृंगार करण्यात आला. त्यानंतर शहरातील विविध भागांतून आलेले निशान श्री श्याम बाबांच्या चरणी अर्पण करण्यात आले व महाआरती संपन्न झाली.



निशान यात्रेत सहभागी झालेल्या भाविक भक्तांना प्रसाद स्वरूपात अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. सायंकाळी ६ वाजता अकोल्याचे सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय भजन गायक पंडित उमेश उर्फ डब्बू शर्मा तसेच नेतल शर्मा यांनी हिंदी, मराठी व राजस्थानी श्याम भजनांची सुरेल मैफल सादर करून उपस्थित भक्तांना मंत्रमुग्ध केले.

श्री श्याम बाबांच्या मनोहारी शृंगार दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविकांनी मंदिर परिसरात गर्दी केली होती. संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला.

## पणजला प्रजासत्ताक दिनी भारतीय सैन्य दलात कार्यरत जवानाकडून झेंडावंदन

प्रतिनिधी २९ जानेवारी

**अकोट:** मातोश्री सरस्वतीबाई सावरकर इंग्लिश स्कूल येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष गजानन सावरकर तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून भारतीय सैनिक निलेश राऊत, वैभव वारोकार., अक्षय अकोटकर, मंगेश वसु प्रणित आकोट कार, राजेंद्र भुस्कट, गजानन बोचे, संस्थेच्या शीलाताई सावरकर अक्षय सावरकर, संचालक प्राचीताई सावरकर यांच्या उपस्थितीत भारतीय सैनिक निलेश राऊत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

वैभव वारोकार, अक्षय अकोटकर, मंगेश वसु तसेच नव्याने



भारतीय सेनेत ज्यांची निवड झाली असे प्रणित अकोटकर यांचा संस्थेच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मातोश्री सरस्वतीबाई सावरकर इंग्लिश स्कूल पणज येथे वर्षभर राबविण्यात आलेल्या विविध उपक्रम खेळ व स्पर्धा यामध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा मोमेंटो व व प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त भाषणे दिलीत तसेच नेत्र दीपक असे देशभक्तीपर नृत्य कला अविष्कार सादर केले. याप्रसंगी नागरिक, पालक, पत्रकार दिनेश बोचे, विद्यार्थी व पालक शिक्षक संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपालीताई म्हसाळ व अर्चनाताई बेलोकार यांनी तर आभार नीलिमा वाघ यांनी केले.

## सेंट पॉल्स पब्लिक स्कूलमध्ये गणतंत्र दिवस साजरा




प्रतिनिधी २९ जानेवारी

**अकोट:** सेंट पॉल्स पब्लिक स्कूलमध्ये गणतंत्र दिवसानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटीया, प्रमुख अतिथी दिपम लखोटिया व अवनी लखोटिया , लुणकरन डागा,प्रमोद चांडक, शारदा लखोटिया ,प्रा. द्वारकाप्रसाद बसेर, कविता मिश्रा व्यासपीठावर उपस्थित होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण झाले .त्यानंतर राष्ट्रगीत ,संविधान , प्रतिज्ञा घेण्यात आली व प्रतिमा पूजन करून मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले . वर्ग नर्सरी ते पाचविच्या विद्यार्थ्यांनी गणतंत्र दिनाबद्दल आपले विचार मांडले. स्वरा वानखडे, ज्ञानाई कुलट, प्रवीण कुलट यांनी देशभक्तीपर विविध गीत सादर केले. कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्साह आणि देशाप्रती अभिमान झळकत होता. प्रमुख अतिथी दिपम लखोटिया यांनी आपल्या भाषणातून देशाप्रती आपली सर्वांची जबाबदारी आपण पार पाडली पाहिजे असे सांगितले . यानंतर अवनी लखोटिया यांनी आपल्या संविधानाने विविध धर्म जाती पंथांच्या लोकांना एकत्र येऊन काम करणे व यशस्वी होणे याचा मार्ग दाखवून दिला आहे.

## अजितदादा पवार यांच्या निधनाने कच्छी मेमन समाजात शोककळा

प्रतिनिधी २९ जानेवारी

**◆ युसूफ पुंजनी यांच्यासह भेट झाली होती- जावेद झकरिया**

**अकोला:** महाराष्ट्राच्या राजकारणात वेगवान निर्णयक्षमता, सक्षम प्रशासन आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व यांचे प्रतीक असलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने संपूर्ण राज्यासह कच्छी मेमन समाजात तीव्र शोककळा पसरली आहे. त्यांचे निधन हे समाज व राजकारणासाठी अपूरणीय नुकसान आहे.

कच्छी मेमन जमात संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने घेतलेली ती महत्त्वाची भेट आज समाजाला विशेषतः आठवत आहे. ही भेट संघर्ष समितीचे अध्यक्ष युसूफ पुंजनी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली होती. युसूफ पुंजनी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने समाजाशी संबंधित गंभीर विषय अत्यंत ठामपणे व स्पष्टपणे अजितदादा पवार यांच्या समोर मांडला होता.

या भेटीदरम्यान अजितदादा



पवार यांनी विषयाची गांभीर्याने दखल घेत तत्काळ संबंधित सचिवांना बोलावून महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय (जी.आर.) काढण्याचे आदेश दिले. त्यांच्या आदेशांचा परिणाम असा झाला की त्याच दिवशी रात्री १० वाजता कच्छी मेमन समाजाला महाराष्ट्र शासनाचा अधिकृत शासन निर्णय प्राप्त झाला.

इतक्या कमी वेळेत निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणे, ही अजितदादा पवार यांच्या कार्यशैलीचे अनोखे व प्रभावी उदाहरण होते. काम करण्याची त्यांची पद्धत खरोखरच निराळी होती.

या शिष्टमंडळात कच्छी मेमन समाज संघर्ष समितीच्या श्रेष्ठ मंडळाचे सदस्य युसूफ पुंजनी, जावेद झकरिया, यासीन नगानी, फिरोज दोसानी, इरफान अकबानी, इब्राहिम घानीवाला व अरबाज धारीवाला यांचा समावेश होता. सर्व सदस्यांनी एकजुटीने समाजाचा आवाज प्रभावीपणे मांडला.

अजितदादा पवार यांच्यासारख्या वेगवान, निर्णयक्षम आणि परिणाम देणाऱ्या नेत्याचे जाणे अत्यंत दुःखद आहे. युसूफ पुंजनी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या त्या भेटीत ज्या तत्परतेने समाजाला न्याय मिळाला, ते अजितदादा पवार यांच्या प्रभावी नेतृत्वाचे अविस्मरणीय उदाहरण आहे. कच्छी मेमन समाज त्यांचे योगदान सदैव स्मरणात ठेवेल. ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती देवो आणि शोकसंतप्त कुटुंबीयांना व समस्त समाजाला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

**- जावेद झकरिया**
प्रदेश संघटक सचिव
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
(शरदचंद्र पवार)

## श्रीमद् देवी भागवत कथा व पंचकुंडी शतचंडी यागाचा भक्तिभावात प्रारंभ



**अकोला:** शहरातील केशव नगर परिसरात सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी श्रीमद् देवी भागवत कथा व पंचकुंडी शतचंडी यागाचा भक्तिभावपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. या निमित्ताने सर्वप्रथम परिसरातून भव्य ग्रंथ शोभायात्रा मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात काढण्यात आली. या शोभायात्रेत अकोला, बुलढाणा, पुणे, अंजनगाव सुर्जी, शेगाव व संभाजीनगर येथून आलेल्या असंख्य भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अवघ्या ४ वर्षांच्या बालकांपासून ते ८० वर्षांपर्यंतच्या आबाल–वृद्ध, स्त्री-पुरुष सर्वांनी मोठ्या श्रद्धेने व उत्साहाने शोभायात्रेत सहभाग घेतला. यावेळी केशव नगर वासीयांनी संपूर्ण परिसरात सडा–रांगोळ्यांनी रस्ते सुशोभित करून श्रीमद् देवी भागवत ग्रंथ, परमपूज्य योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराजांच्या पादुका आणि भागवताचार्य पू. श्री अंबरीश महाराजांचे औक्षण अत्यंत भक्तिभावाने केले.

## अजितदादा यांच्या निधनाने उत्कृष्ट प्रशासक हरपला : आमदार रणधीर सावरकर

प्रतिनिधी २९ जानेवारी

**अकोला :** उत्कृष्ट प्रशासक, मातीशी जुळलेला कार्यकर्त्यांचा आधारस्तंभ बहु आयामी व्यक्तिमत्त्वाचे धनी स्पष्ट वक्ता प्रत्येकाला मदत करण्याची मनोवृत्ती असणारा सुखदुःखात धावणारा लोकनेता अजित दादा पवार यांच्या निधनाने भारतीय जनता पार्टी परिवाराची फार मोठी हानी झाली आहे. महाराष्ट्राची नव्हे तर देशाची सुद्धा राजकीय क्षेत्रात न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली अशा शब्दात भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. भारतीय जनता पार्टी कार्यालया त संतोष शिवरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शोकसभेत व भावपूर्ण श्रद्धांजली सभेत ते बोलत होते. विधिमंडळात सर्वात आधी येऊन प्रत्येक बाबीचा



अभ्यास करून त्यांच्या प्रश्नाची उत्तर देणारा, सामाजिक दायित्व लक्षात घेऊन जात-पात न न पाहणारा न पाहणारे लोकनेता, अकोल्याच्या अनेक योजनेला चालना देणारे माजी खासदार संजय भाऊ धोत्रे यांच्याशी असलेले त्यांचे संबंध परिवार पवार परिवारांचे असलेले नाते यामुळे फार मोठी हानी झाली आहे. अशाही शब्दात आपल्या भावना आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केल्या. यावेळी किशोर पाटील, विजय अग्रवाल, जयंत मसने, बळीराम सिरस्कार, परिमल कांबळे, अंबादास उमाळे, उषाताई विरक, चंदाताई शर्मा, डॉ. किशोर मालोकार विनोद मनवानी, हरीश आलीमचदाणी, माधव मानकर, मनीष गावंडे एडवोकेट रूपाली काकड कृष्णा चव्हाण, किशोर कुचके सतीश ढगे अनिल गरडयांनी सुद्धा भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाचे संचालन गिरीश जोशी यांनी केले. प्रास्ताविक एडवोकेट देवाशिष काकड यांनी केले. यावेळी भाजपा शहर आणि ग्रामीणचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. अकोला लोकसभा मतदारसंघाच्या वतीने खासदार अनुप धोत्रे यांनी बारामती येथे जाऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## अजित पवारांची औद्योगिक विकासात मोठी भूमिका – निकेश गुप्ता

प्रतिनिधी २९ जानेवारी




**अकोला :** राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते अजित पवार यांचे दुःखद निधन ही राज्यासाठी कधीही भरून न निघणारी हानी असून, त्यांच्या निधनामुळे औद्योगिक विकासाचा एक दूरदृष्टी असलेला नेता आपल्यातून हरपला आहे. असे मत प्रादेशिक मारवाडी संमेलनाचे प्रांतीय अध्यक्ष आणि विदर्भ चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी व्यक्त करून अजित पवार यांच्या निधनाबद्दल त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

राज्याच्या औद्योगिक विकासाबाबत अजित पवार यांची दूरदृष्टी होती. राज्याचे अर्थमंत्री म्हणून त्यांनी अर्थसंकल्पात औद्योगिक विकासासाठी मोठी आर्थिक तरतूद केली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी संमेलनाचे वरिष्ठ मार्गदर्शक आणि राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री, ज्येष्ठ राष्ट्रवादी नेते रमेश बंग यांच्या माध्यमातून राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्याशी अनेकदा संवाद साधण्याची संधी मिळाली होती. संमेलनाचा प्रांतीय अध्यक्ष या नात्याने रमेश बंग यांच्या मार्गदर्शनाखाली संमेलनाला अजित पवार यांनी मोठी वैचारिक प्रेरणा दिली होती, असे मत निकेश गुप्ता यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या निधनावर व्यक्त केले.


## अंतर्गत सजावटीसाठी विजय इंटेरियो अद्ययावत दालनाचा थाटात शुभारंभ

**◆ सहकार नगर भागात थाटलेल्या आकर्षक शोरूमने वेधले अकोलेकरांचे लक्ष**

प्रतिनिधी २९ जानेवारी




**अकोला :** बदलत्या काळानुसार प्रतिष्ठाने तसेच वास्तूंच्या अंतर्गत सजावटीवर भर दिला जात आहे. ग्राहकांच्या गरजेनुसार अंतर्गत सजावट साहित्य विजय इंटेरियो या भव्य शोरूम मध्ये उपलब्ध होणार आहे. गोरक्षण रोडवर सहकार नगरात भारत पेट्रोल पंप समोर दालन थाटले आहे. २४ जानेवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ झाला. आर्किटेक्ट विजय देठे, आर्किटेक्ट अदिती देठे, अभियंता कुणाल



अरविंद देठे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

विजय इंटेरियो अद्ययावत दालनात सॉफिट पॅनल्स, पीव्हीसी पॅनल्स, चार्कोल लाऊवर्स, डब्ल्यूपीसी लाऊवर्स, थ्री डी टाईल्स, सिलिंग टाईल्स, फोम शीट्स, मिरर मोझाईक, पीयू स्टोन पॅनल्स, डेकोरेटीव टाईल्स, प्रीफॅब सोल्युशन तसेच सर्व प्रकारचे इंटेरियर सोल्युशनस होलसेल आणि रिटेल मध्ये उपलब्ध आहेत. अकोला शहरात उत्तमोत्तम गृह सजावट साहित्य उपलब्ध झाल्यामुळे ग्राहकांना अन्यत्र जाण्याची गरज नाही. या प्रतिष्ठानला अवश्य भेट द्या असे आवाहन देखील देठे कुटुंबियांनी केले आहे.

## कवयित्री वंदना सतीश तिडके यांच्या स्पंदन काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**मुक्ता पब्लिकेशन अकोला द्वारा काव्यसंग्रह प्रकाशित**

प्रतिनिधी २९ जानेवारी

**अकोला :** कवयित्री वंदना सतीश तिडके यांचा स्पंदन काव्यसंग्रहाचे प्रकाशन डॉ. श्रीकांत तिडके यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कवी उद्धव गावंडे यांच्या हस्ते रविवारी दुपारी झाले. सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. वंदना तिडके यांनी काव्यसंग्रहातील मर्म उलगडून दाखवले. निर्मिती प्रक्रियेवर देखील त्यांनी भाष्य केले.

स्पंदन काव्य संग्रह प्रकाशनाच्या अध्यक्षस्थानी श्री गाडगे महाराज महाविद्यालय मूर्तिजापूरचे माजी प्राचार्य, साहित्यिक डॉ. श्रीकांत तिडके होते. ज्येष्ठ कवी तथा ग्रामीण बँकेचे माजी व्यवस्थापक उध्दव गावंडे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. प्रमुख अतिथी कवी




सुरेश पाचकवडे, महाजेनकोचे सेवा निवृत्त कार्यकारी अभियंता हेमंत बेंडे नागपूर, कादंबरीकार पुष्पराज गावंडे होते. संचालन प्रा. महादेव लुले, 'देवबाबु' यांनी केले. सतीश शंकरराव तिडके, सौ. वंदना सतीश तिडके, अनुराग सतीश तिडके, सौ. ऋतुजा अनुराग तिडके, प्रणव हेमंत बेंडे, सौ. अनुराधा प्रणव बेंडे, सागर लोडम यांचा देखण्या आयोजनात सहभाग होता. कवयित्री वंदना तिडके म्हणाल्या, बदलती सामाजिक परिस्थिती, शेतकरी आत्महत्या, स्त्रीयांवरील अत्याचार या विषयांना प्राधान्य दिले आहे. सर्वच साहित्यिक विशिष्ट जाणीवेतून साहित्य लेखन करत असतात. स्पंदन काव्यसंग्रहातून वैविध्य जपण्याचा प्रयत्न केला आहे. आशयाच्या अभिव्यक्ती साठी मुक्त छंदाला महत्त्व दिले. स्त्रीवाद ही महत्त्वाची भूमिका स्पंदन संदर्भात राहिल्याचे वंदना तिडके यांनी सांगितले. काव्यसंग्रहाविषयी बोलताना डॉ. श्रीकांत तिडके म्हणाले, वंदना तिडके यांचा पहिला काव्यसंग्रह सुसंस्कृतपण आणि सामाजिक जाणीव असलेला आहे. कोरोना पासून स्त्रियांच्या प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली आहे. ही कविता विद्रोही नाही तर स्त्री मनाने भोवतीच्या संवेदना कवयित्रीने टिपल्या आहे. शांत संयमी अशी कविता आहे. मनातील स्त्रीवादावर त्यांनी भाष्य केले आहे. स्त्रीवादावर वंदना तिडके यांनी पी. एचडी केली असती तर त्यांना अधिक प्रभावीपणे व्यक्त होता आले असते असे मला वाटते असे डॉ. श्रीकांत तिडके म्हणाले. काव्यसंग्रहाचे त्यांनी स्वागत केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# नवजात अर्भक नाल्यात फेकले; माता-पित्याला अटक

प्रतिनिधी २९ जानेवारी

**पांढरकवडा :** पांढरकवडा शहरात मानवतेला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली असून, नवजात स्त्री अर्भक नाल्यात टाकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अवघ्या दोन तासांत संबंधित अर्भकाचे माता-पिता शोधून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

बुधवार, २८ जानेवारी २०२६ रोजी पहाटे सुमारे ३.३० वाजताच्या सुमारास हनुमान वॉर्ड परिसरातील एका नाल्यातून बाळाच्या रडण्याचा आवाज येत असल्याचे स्थानिक नागरिक केतन गजानन कटकोजवार यांच्या लक्षात आले. त्यांनी शेजाऱ्यांच्या मदतीने पाहणी केली असता नाल्यात नवजात स्त्री अर्भक जिवंत अवस्थेत आढळून आले. नागरिकांनी तत्काळ माणुसकी दाखवत बाळाला नाल्यातून बाहेर काढून उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सध्या बाळावर वैद्यकीय देखरेखीखाली उपचार सुरू असून, त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. याप्रकरणी पांढरकवडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ११९/२०२६ नोंदविण्यात आला असून भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ९३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि स्थानिक चौकशीच्या आधारे अवघ्या दोन तासांत बाळाचे माता-पिता शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. अर्चना सुनिल शिवरकर (वय २८) आणि सुनिल पिंगाबर शिवरकर (वय ३१, दोघेही रा. नेहरू वॉर्ड, पांढरकवडा) अशी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे आहेत.

बाळाला नाल्यात टाकण्यामागील नेमके कारण काय, याबाबत पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप नरसाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## श्री गणेश जन्मोत्सवात महाप्रसादाचा कार्यक्रम

प्रतिनिधी २९ जानेवारी



**पारवा :** पारवा येथील श्री गणेश मंडळाच्या आयोजनात श्री गणेश जन्मोत्सवाचे कार्यक्रम शुक्रवार, 30 जानेवारी रोजी पार पडत आहेत. या सप्ताहाचा आज शुक्रवारला शेवटचा दिवस असल्याने मंडळाने महाप्रसादाचा विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे. श्री पद कृष्णकुमार कृष्णा कुमार पांडे महाराज यांच्या उपस्थितीत पार पडणाऱ्या या कार्यक्रमाचा पारवा परिसरातील भाविकांनी तसेच परगावातील भाविकांनी लाभ घ्यावा, अशी विनंती आयोजकांनी केली आहे.



# अडेगाव येथे रस्त्यासाठी उपोषण



प्रतिनिधी २९ जानेवारी

**झरी जामणी :** झरी जामणी तालुक्यातील अडेगाव येथील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी असलेला वहिवाटीचा रस्ता बंद करण्यात आल्याने शेतीकामांवर परिणाम होत असून शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मौजा अडेगाव, खंड क्रमांक १ मधील सव्हे नंबर ५१ येथील रस्ता लोधा सोलर प्लॅन्टने बंद केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

या संदर्भात दि. २२ जानेवारी २०२६ रोजी समस्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यवतमाळ यांना निवेदन सादर करून रस्ता तात्काळ खुला करून देण्याची मागणी केली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

यापूर्वी दि. १५ जानेवारी रोजी शेतकऱ्यांनी तहसीलदार झरी जामणी यांच्याकडे रस्ता मोकळा करण्याची मागणी केली होती. त्यानंतर दि. १६ जानेवारी रोजी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पंचनामा करून शेतात जाण्याचा मार्ग खुला ठेवण्याच्या सूचना संबंधित कंपनीला दिल्या होत्या. असे असतानाही संबंधित कंपनीने रात्रीच्या वेळी काम करून रस्ता पुन्हा बंद केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

प्रशासनाकडून दखल न घेतल्याने अखेर समस्त शेतकऱ्यांनी दि. २८ जानेवारी २०२६ पासून उपोषण सुरू केले आहे. उपोषण काळात कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी शासनावर राहील, असे शेतकऱ्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

दरम्यान, कंपनीसमोरील सरकारी जमिनीवर दिवाकर दादाजी काळे यांनी अतिक्रमण करून रस्ता बंद केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असून, ते अतिक्रमण तात्काळ काढून शेतकऱ्यांचा वहिवाटीचा रस्ता मोकळा करण्याची मागणी करण्यात आली आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन योग्य कार्यवाही करावी, अशी मागणी शरद कृष्णदेव काळे यांच्यासह शिवारातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# कब्रस्थान व स्माशानभूमी रस्त्याची मागणी

प्रतिनिधी २९ जानेवारी




**आर्णी :** आर्णी येथील बोरगाव-दाभडी रोडवरील मुस्लिम कब्रस्थान व हिंदू स्माशानभूमी आजही रस्त्याशिवाय आणि वॉल कम्पाऊटशिवाय असल्याने परिसरात घाणीकचरा पसरलेला आहे. यावर शिवसेना महिला आघाडी तालुका प्रमूख व शिवउद्योग संघटना यवतमाळ जिल्हा प्रमूख अश्वीनी देशमूख यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी रविंद्र राऊत व नगराध्यक्ष नालंदा भरणे यांना निवेदनाद्वारे तातडीची दखल घेण्याची मागणी केली आहे.

निवेदन देतांना अश्वीनी देशमूख (तालुका प्रमूख), संध्या मुनेश्वर (शहर प्रमुख), कविता चव्हाण (उपशहर प्रमूख), कविता मोरे (संघटक), अभिलाष इंगोले (विधानसभा अध्यक्ष), मुस्ताक जब्बार शेख (अल्पसंख्यांक शहर प्रमुख), सागर मेश्राम (विभाग प्रमुख), इमरान अय्युब खान, मुजाहिद दिलावर खान, हुजेफा रउफ शेख, मुदस्सर मातीन खान, यासीन मामू शेख, सलमान खान, रशीद खान इत्यादी उपस्थित होते. "कब्रस्थान व स्माशानभूमी नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. परिसराची साफसफाई, संरचना व सौंदर्यीकरण करणे ही नगरपरिषदेची जबाबदारी आहे. या कामासाठी लवकरात लवकर निधी आणि कारवाई करावी, ही आमची मागणी आहे."

# श्रेयवादात अडकले कृष्णापुरातील ध्वजारोहन

## पोलीस पाटलाची उपविभागीय अधिकाऱ्याकडे तक्रार; दोषींवर कारवाईची मागणी

प्रतिनिधी २९ जानेवारी

**उमरखेड :** तालुक्यातील कृष्णापुर गावात गेल्या अनेक वर्षांपासून मुख्य चौकात होत असलेले परंपरागत ध्वजारोहन यंदा श्रेयवादामुळे होऊ शकले नाही. प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहन न झाल्याने गावात चर्चेला उधाण आले असून, या प्रकरणी अतिरिक्त कार्यभार असलेल्या पोलीस पाटलांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करून दोषींवर चौकशीअंती कारवाईची मागणी केली आहे.

परंपरेनुसार स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनी गावातील मुख्य चौकात पोलीस पाटलांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात येत होते. मात्र कृष्णापुर येथील पोलीस पाटलांचे पद रिक्त असल्याने गोविंदपूर येथील पोलीस पाटील बालाजी भोयर यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. सुरुवातीच्या काळात त्यांच्या हस्तेच ध्वजारोहन करण्यात आले. मात्र 'बाहेरील व्यक्ती ध्वजारोहन करीत असल्याने काहींनी आक्षेप घेतला आणि त्यातूनच परंपरा खंडित करण्याचा प्रयत्न झाला,' असा आरोप भोयर यांनी केला आहे.

दरम्यान, परंपरेनुसार ध्वजारोहन करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी करणारे निवेदन बालाजी भोयर यांनी १६ जानेवारी रोजी उमरखेडचे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर केले होते. त्यानंतर संबंधित यंत्रणेला चौकशीचे आदेश देण्यात आले. चौकशीअंती मुख्य चौकातील ध्वजवंदन पोलीस पाटलांच्याच हस्ते होत असल्याचे निष्पन्न झाल्याचे सांगण्यात आले.

यानुसार प्रजासत्ताक दिनी ध्वजवंदन करण्यासाठी बालाजी भोयर मुख्य चौकात उपस्थित झाले. मात्र ग्रामपंचायतीत ठेवलेला ध्वज आणि दोरी अचानक उपलब्ध न झाल्याने ध्वजारोहन करता आले नाही. अखेर केवळ संविधानाचे वाचन करून कार्यक्रम आटोपता घ्यावा लागला. या घटनेमुळे अखंडपणे सुरू असलेली मुख्य चौकातील ध्वजारोहनाची परंपरा यंदा खंडित झाली.

या संपूर्ण प्रकारामागे जाणीवपूर्वक ध्वज लपवून ठेवण्यात आल्याचा आरोप करत बालाजी भोयर यांनी संबंधितांवर चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी आपल्या निवेदनातून केली आहे. या प्रकरणी प्रशासनाकडून काय भूमिका घेतली जाते, याकडे कृष्णापुरवासीयांचे लक्ष लागले आहे.

> ■ 'परंपरेनुसार माझ्याच हस्ते ध्वजवंदन होणार असल्याचे समजताच काहींनी जाणीवपूर्वक ध्वज लपवून ठेवला,'असा आरोप अतिरिक्त पोलीस पाटील बालाजी भोयर यांनी केला आहे.

# सामाजिक उपक्रमातून मानवतेचा संदेश



प्रतिनिधी २९ जानेवारी

**आर्णी :** नागपूरच्या ताजबाग येथील हजरत बाबा ताजुद्दीन यांचा वाढदिवस आर्णी शहरात भक्तिभावाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत आर्णीतील युवक मयूर खान यांनी स्वखर्चातून ग्रामीण रुग्णालयात रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांना फळे व बिस्कीटचे वाटप केले.बाबा ताजुद्दीन यांचा देशभर मोठा भक्तवर्ग असून, सर्वधर्मसमभाव, सेवा आणि करुणा या मूल्यांचा प्रसार त्यांच्या विचारांतून झाल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. कोणतीही प्रसिद्धी न घेता मयूर खान यांनी राबविलेल्या या उपक्रमामुळे सामाजिक एकोपा आणि मानवतेचा संदेश दिला गेला. कार्यक्रमादरम्यान बाबा ताजुद्दीन यांच्या जीवनकार्याचा व विचारांचा परिचय करून देण्यात आला. 'सेवा हीच खरी इबादत' या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले.या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्थानिक युवक, नागरिक व ज्येष्ठांनी मयूर खान यांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी इरफान रजा, अबीद फानन, सय्यद नौशाद, नगरसेवक सैय्यद रियाज, आमीन पठाण, साहिल शेख, डॉ. फैजान, गुड्डू आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना रंगमंच; जि.प.शाळा बेलखेड येथे सांस्कृतिक व स्नेहसंमेलन

प्रतिनिधी २९ जानेवारी




**पुसद :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बेलखेड येथे आयोजित सांस्कृतिक व स्नेहसंमेलन कार्यक्रम दि. २७ जानेवारी रोजी अत्यंत उत्साहपूर्ण, आनंदी व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी विजय बेतेवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमास कुपटी केंद्रप्रमुख विजय मुंगे, सुकली केंद्रप्रमुख विजय इंगोले, मारलेगाव केंद्रप्रमुख संजय देशमुख, तरोडा केंद्रप्रमुख आनंद देशमुख, देवकते सर तसेच नुकतीच पीएच. डी. पदवी प्राप्त केलेले शिक्षक तय्यब शेख हे मान्यवर म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ व दानशूर व्यक्तींचे मोलाचे सहकार्य लाभले. शाळेच्या सुरक्षा भिंतीसाठी नागेश वाळूकर यांनी दोन फूट जागा उपलब्ध करून दिली, तर अत्यंत माफक दरात मंडपाची सुविधा लखन राठोड यांनी उपलब्ध करून दिल्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाची सुसूत्र रूपरेषा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनिल जाधव, शिक्षणतज्ज्ञ अंकुश वाळूकर तसेच मुख्याध्यापक सखाराम पाटील व मार्कड यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशात शाळेच्या शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थांचे मोलाचे योगदान लाभले. या सांस्कृतिक व स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून शाळा व समाज यांच्यातील सहकार्याचे सुंदर चित्र दिसून आले असून शाळेच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा व चालना मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# एकाच अधिकाऱ्यावर तीन शहरांची जबाबदारी; ढाणकीला कायमस्वरूपी मुख्याधिकारी कधी?

प्रतिनिधी २९ जानेवारी

**ढाणकी :** शहराचा विस्तार वाढत असून नागरी समस्यांची गुंतागुंत दिवसेंदिवस वाढत असताना ढाणकी नगरपंचायतीच्या नशिबी मात्र अद्यापही प्रभारी कारभारच आहे. सध्या उमरखेड नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्याकडे उमरखेडसह महागाव व ढाणकी या दोन नगरपंचायतींचा अतिरिक्त पदभार आहे. एकाच अधिकाऱ्याकडे तीन शहरांची जबाबदारी असल्याने ढाणकीतील विकासकामांचा वेग मंदावल्याचे चित्र असून, शहराला पूर्णवेळ मुख्याधिकारी कधी मिळणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

डॉ. अजय कुरवाडे हे सक्षम अधिकारी असले तरी उमरखेडसारख्या मोठ्या शहराचा व्याप सांभाळताना महागाव व ढाणकीसाठी पुरेसा वेळ देणे त्यांना शक्य होत नसल्याची वस्तुस्थिती आहे. तीन शहरांमधील अंतर, स्थानिक समस्या, प्रशासकीय बैठका व शासकीय कामकाज यामुळे मोठी ओढाताण होत आहे. याचा थेट परिणाम ढाणकीतील स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा आणि प्रलंबित विकासकामांवर होत असल्याचे दिसून येत आहे.

पूर्णवेळ मुख्याधिकारी नसल्याने अनेक महत्त्वाच्या योजनांच्या फायलींवर स्वाक्षरी होण्यास विलंब होत आहे. तसेच मुख्याधिकारी आठवड्यातून ठराविक दिवस किंवा ठराविक वेळेसच उपलब्ध असल्याने नागरिकांना आपल्या तक्रारी मांडण्यासाठी मोठी प्रतीक्षा करावी लागत आहे. प्रभारी कारभारामुळे शहराच्या दीर्घकालीन विकासाचे नियोजन केवळ कागदावरच राहण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

ढाणकी नगरपंचायतीची स्थापना होऊन अनेक वर्षे उलटली असली तरी शासनाला अद्याप स्वतंत्र व पूर्णवेळ मुख्याधिकारी नियुक्त करता आलेला नाही. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी व नवनिर्वाचित नगराध्यक्षांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देत राज्य शासनाकडे तातडीने पाठपुरावा करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# नृत्य, गायन व देशभक्तीपर सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली

प्रतिनिधी २९ जानेवारी




**उमरखेड :** मुळावा येथील स्व. बापूमियाँ देशमुख महिला बहुउद्देशीय संस्थेद्वारे संचालित आलीशान इंग्लिश स्कूलमध्ये 'उडान–१२' हा वार्षिक सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देणाऱ्या या उपक्रमाचे यंदा बारावे वर्ष होते.

महोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तातुभाऊ देशमुख (सरचिटणीस, प्रदेश काँग्रेस कमिटी; माजी सभापती, अर्थ व बांधकाम समिती, यवतमाळ) होते. प्रमुख पाहुणे म्हणून निलेश शेंबडे (पीएसआय, पोफाळी पोलीस स्टेशन) उपस्थित होते. यावेळी डॉ. डी. एन. देशमुख (माजी सरपंच), शारदा जाधव (सरपंच), संजू देशमुख (उपसरपंच), नामदेवराव सुरोशे, ॲड. मोहम्मद शहेबाज यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, गायन, भाषण तसेच देशभक्तीपर कार्यक्रमांना प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. विशेषतः चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. शिक्षणासोबतच सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व यावेळी मान्यवरांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभयकुमार सुरोशे यांनी केले, तर आभार प्रदर्शन महेफुज यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका शादाब देशमुख, महेफुज अफसरमियाँ देशमुख, सानिका सौंदनकर, प्रियंका गायकवाड, प्रियंका सोनटक्के, कमलाबाई जोगदंड, सुधाकर आंडगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांचे सहकार्य लाभले.

# विद्यार्थ्यांना शालेय व क्रीडा साहित्याचे वाटप

प्रतिनिधी २९ जानेवारी



**महागाव :** तालुक्यातील डोंगरगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह शालेय व क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी सात वाजता गावातून काढण्यात आलेल्या प्रभात फेरीने झाली. या प्रभात फेरीत विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान केल्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. सकाळी आठ वाजता शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुख्याध्यापक गजानन पद्मावार तसेच शिक्षक नितीन तगडपल्लेवार, अनंत जारंडे, निकील थेटे, सुखदेव फोपसे व शिक्षिका खुळे व लकडे यांनी उत्कृष्ट नियोजन करून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी लेझीम, मनोरे तसेच देशभक्तीपर नृत्य व भाषणे सादर केली. कार्यक्रमात आयटीआय यवतमाळ येथे शिक्षण घेत असलेले महेश नेमाडे यांनी भारतात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शुभम दीपकराव देशमुख यांनी पाच हजार रुपयांचे क्रीडा साहित्य, अमोल बावणे यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वही व पेन, तर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत देशमुख यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशांत देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच अर्चना वारकड, उपसरपंच सय्यद ऐसान सय्यद खलील, ग्रामपंचायत सदस्य दिगंबरराव देशमुख, माजी सरपंच बालासाहेब देशमुख, रोजगार सेवक सदाशिव हाडसे यांच्यासह शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात प्रशांत देशमुख यांनी शाळेची गुणवत्ता व शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना मदत करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत जारंडे यांनी केले तर आभार सुखदेव फोपसे यांनी मानले.

५

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि. २९ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अखेरचा वादा, गेले 'दादा', अलविदा...



# दादांच्या एक्झिटने जिल्हा हळहळला !

## *वाशीम जिल्ह्याशी होते अनोखे ऋणानुबंध * मान्यवरांनी व्यक्त केल्या शोकसंवेदना

● सिटी न्युज ब्युरो@ वाशीम ●

राज्याच्या राजकारणातील 'दादा' माणुस म्हणून ओळखले जाणारे ४० वर्षापासून राजकारणात दबदबा निर्माण करणारे ६ वेळा उपमुख्यमंत्री असणारे अजित पवार यांचे बुधवारी दि. २८ रोजी सकाळी विमान अपघातात निधन झाले. अजितदादाच्या वृत्तानंतर जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनानंतर राजकीय वर्तुळातून शोक व्यक्त केला जात आहे. दादांचे वाशीम जिल्ह्याशी असलेल्या ऋणानुबंधामुळे त्यांच्या एक्झिटने जिल्हावासीयांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. त्यांचे वाशीम जिल्ह्यातील अनेकांशी पारिवारीक संबंध होते. त्यांनी जिल्ह्याच्या विकासाला चालणा देण्यासाठी सिंचनाच्या निधीसह इतरही कोट्यवधीचा निधी दिला.

जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प असो की अन्य प्रकल्प उपमुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री व अर्थमंत्री म्हणून अजित यांनी नेहमीच वाशिमचा प्रश्नांना प्राधान्य दिले. सन २०२०-२१ मध्ये ग्रामीण भागाच्या विकासासाठी निधीचा पाठपुरावा केला असता, अजितदादांनी ५५ कोटींचा अतिरिक्त निधी दिला होता, जलसंपदा मंत्री म्हणून जिल्ह्यातील प्रकल्पांनादेखील न्याय दिला, असे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा राष्ट्रवादी (अजित पवार) चे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांनी सांगितले, एकसंध राष्ट्रवादी कॉंग्रेस असतांना यांनी २०१२ मध्ये रिसोड, मंगरूळपीर, वाशिम, मेडशी येथे भेट दिली होती. १९९१ मध्ये ते खासदार असताना संसदेत त्यांच्यासोबत काम करताना कार्यकर्त्यांप्रती असलेली आपुलकी व राज्याच्या प्रगतीसाठीची त्यांची तळमळ अनुभवता आली, अशा शब्दात माजी खासदार अनंतराव देशमुख यांनी आठवणींना उजाळा दिला. गेल्या १३ वर्षापासून विधिमंडळात अजितदादांची रोखठोक, स्पष्ट, निर्भीड, प्रामाणिक कार्यशैली अनुभवता आली. जिल्ह्याच्या विकासात्मक प्रकल्पांत त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. युवकांसाठी ते आदर्श होते, तर जनतेसाठी विश्वासाचा आधारस्तंभ होते, अशा शब्दांत आमदार अमित झनक यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. २०१२ मध्ये रिसोड येथील सूतगिरणीच्या उद्घाटनप्रसंगी ते आले होते. त्यांचा रोखठोक स्वभाव, ठाम निर्णय आणि जनतेसाठी झटण्याची तळमळ जवळून अनुभवता आली. त्यानंतरही वाशिमचा एकसंध राष्ट्रवादी कॉंग्रेसचा जिल्हाध्यक्ष म्हणून अजितदादांशी विविध विषयांवर चर्चा झाली होती, त्यांच्या मनात जे असेल, तेच ओठांवर असायचे, कोणताही आडपडदा नाही की दिखावा नव्हता, अशा शब्दात राष्ट्रवादी (शरद पवार) चे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील-खडसे यांनी जुन्या आठवर्षींना उजाळा दिला. २०१९ नंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर एका घटक पक्षाचा (तत्कालीन शिवसेना) पदाधिकारी म्हणून अजितदादांना अनुभवता आले. अत्यंत कणखर, विकासाची दृष्टी असणारा कुठल्याही आपत्तीमध्ये मदत करणारा जात, पात, धर्म, पक्ष न पाहता लोकांसाठी सदैव उपलब्ध असणारे ते खऱ्या अर्थाने लोकनेते होते. उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री म्हणून त्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी भरीव निधी दिला, अशा शब्दात उद्धवसेनेचे जिल्हा सहसंपर्कप्रमुख डॉ सुधीर कवर यांनी आठवणींना उजाळा दिला.



### अजित पवार यांचे वाशिम जिल्ह्याशी ऋणानुबंध

वाशिम : राज्याच्या राजकारणात ठाम निर्णयक्षमता, प्रशासनावर पकड आणि विकासाभिमुख दृष्टिकोनासाठी ओळखले जाणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वाशिम जिल्ह्याशी नाते हे केवळ राजकीय नसून ते ऋणानुबंधाचे आहे. मागील चार दशकांपासून वाशिमच्या विकास प्रवासात अजित पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आमदार, मंत्री, अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री या विविध जबाबदाऱ्या सांभाळताना अजित पवार यांनी वाशिम जिल्ह्याला सातत्याने अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला. विशेषतः ग्रामीण विकास, जलसंधारण, रस्ते, सिंचन, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात जिल्ह्याला भरीव मदत मिळाली. अनेक वेळा जिल्ह्यातील प्रलंबित प्रश्नांना प्राधान्य देत त्यांनी तातडीने निधी मंजूर केला, हे जिल्हावासी विसरू शकत नाहीत.



### दादांची एक्झिट चटका लावणारी

### मान्यवरांनी व्यक्त केल्या शोकसंवेदना

"कंनखर नेतृत्व, स्पष्ट निर्णय क्षमता आणि जनतेशी असलेली नाळ त्यामुळे ते सदैव स्मरणात राहतील. दादा गेल्याची बातमी कळल्याने अति दुख झाले. एक आश्वासक नेतृत्व म्हणून उत्कृष्ट सहकारी म्हणून आम्ही त्यांच्याकडे पाहत होतो. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राची नव्हे तर देशाच्या राजकारणात पोकळी निर्माण झाली आहे.

**भावनाताई गवळी** आमदार

"अजित पवार यांच्या निधनाच्या बातमीने खुप मोठा धक्का बसला. राजकारणात आपला दबदबा निर्माण करणारे 'दादा' नेतृत्व महाराष्ट्राने गमावले. राज्याच्या प्रगतीसाठी त्यांची तळमळ आम्ही अनुभवली. पवार कुटुंबियाच्या व त्यांच्या चाहत्यांना झालेल्या दुखात देशमुख परिवार सहभागी आहे.

**अनंतराव देशमुख** माजी खासदार

"दादा गेल्याचे वृत्तच मनाला पटत नाही जे पोटात तेच ओठात असणारा स्पष्ट निर्भड प्रमाणीक नेता दुळमिळ असतो युवकांसाठी ते आदर्श होते. जनतेचा आधारस्तंभ व विकासाची जाण असलेला नेता महाराष्ट्राच्या राजकारणातून गेल्याने राज्याची नव्हेतर देशाचीच हानी झाली. त्यांनी त्यांच्या विविध खात्यामार्फत जिल्ह्यासाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

**अमित झनक** आमदार

"आजची सकाळ मनाला सुन्न करून टाकणारी होती. एका कार्यक्षम व अभ्यासू युगाचा अस्त झाल्याची बातमी कानी पडताच धक्का बसला. राज्याचे उपमुख्यमंत्री स्पष्ट वक्ते, विकासाचे महामेरू अजितदादा पवार यांचे विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन होणे हे मनाला न पटणारी बाब होती. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाडीचे कार्यक्षम आणि रोखठोक नेतृत्व हरपले आहे.

**सहीताई डहाके** आमदार

"वाशीम जिल्ह्याच्या विकासाला दिशा देणारे नेतृत्व हरपले. महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान दुघटनेत निधन झाले ही घटना अत्यंत दुखदायी असून जिल्ह्याच्या विकासामध्ये त्यांचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्राच्या विकासाला दिशा देणारं नेतृत्व हरपल असून त्यामुळे आम्ही पोरके झाले असून राजकारणातही पोकळी निर्माण झाली.

**चंद्रकांत ठाकरे** जिल्हाध्यक्ष राकॉ.

"उपमुख्यमंत्री अजिददादा पवार यांचे विमान अपघातात निधन झाले त्यामुळे महाराष्ट्रातील त्यांच्यावर जीवापार प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांसह जनताही पोरकी झाली. दादा हे संघर्षशील नेतृत्व करणारे धाडशी नेते होते. ते आपले विचार स्पष्टपणे मांडत. खऱ्याला खरे खोट्याला खोटे म्हणण्याची ताकद दादामध्ये होती. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

**पुरूषोत्तम चितलांगे**
जिल्हाध्यक्ष भाजपा

"अत्यंत कंनखर ,विकासाची दृष्टी असणारा कुठल्याही आपत्तीमध्ये मदत करणारा ,जात ,पात ,पक्ष न पाहता सुर्यदयापूर्वी लोकांसाठी उपलब्ध असणारा नेता प्रशासनावर आणि अधिकारी शाहीवर हुकूम गाजविणारा नेता आपल्यातून निघून गेला. त्यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला आहे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

**डॉ. सुधीर कव्हर**
सहसंपर्क प्रमुख शिवसेना(युटीबी)

"राज्यातील प्रत्यक जिल्ह्याची, तालुक्याची, गावाची माहिती असणारा, प्रत्यक कार्यकर्त्यांना थेटओळखणारा नेता म्हणून दादाचे नाव आदराने घेतल्या जाते. जिल्ह्यातील बॅरेजसाठी त्यांनी मोठा निधी उपलब्ध करून दिला. व छोटे मोठे लघुसिंचन प्रकल्प देवून जिल्ह्यातील सिंचनाचा अनुषेश भरूण काढण्याचा प्रयत्न केला. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

**सुरेश मापारी**
जिल्हाप्रमुख शिवसेना(युटीबी)

"कुशल प्रशासक प्रशासनावर पकड कठोर धाडशी निर्णय घेण्याची शमता असलेले दादा आज आपल्यात नाही. त्यांच्या जाण्याने मन हेलावून टाकले आहे. ते महाराष्ट्राचे केवळ जबाबदार प्रशासक नव्हे तर जनतेसाठी ठामपणे उभा राहणारा एक कंनखर उमदा दुरदृष्टी असलेला नेता होता. त्यांच्या जाण्याने मोठी हानी झाली आहे.

**बाबाराव खडसे पाटील**
जिल्हाध्यक्ष राकॉ.

"शेतकऱ्याच्या दुखाची जाणीव असणारा नेता म्हणजे दादाला ओळखल्या जायचे बॅरेज साठी काम करून सिंचनाची सुविधा जिल्ह्यासाठी निर्माण केली. कर्जमाफी करून शेतकऱ्यांना आधार दिला. बोलून नाही तर करून दाखविले. त्यामुळे दादांच्या निधनाने व्यथीत झालो असून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

**विष्णुपंत भूतेकर**
अध्यक्ष भूमीपूत्र शेतकरी संघटना

# एसबीआय बँकेत झाले नाही ध्वजारोहण !

## *पहा मुजोर शाखाधिकारीची हिम्मत
## *गार्ड नसल्याने राष्ट्रीय सणाला दिली कवडीमोल किंमत

●प्रभाकर नाईकवाडे @ केनवड●

देशभरात २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात, अभिमानाने आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा होत असताना केनवड येथील एसबीआय बँक शाखेत मात्र धक्कादायक प्रकार समोर आला आहे. राष्ट्रीय सणाच्या दिवशी ध्वजारोहण न करता केवळ 'गार्ड उपलब्ध नाही' हे कारण पुढे करून तिरंगाच थांबवण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.




प्रजासत्ताक दिन हा देशाच्या संविधानाचा, लोकशाही मूल्यांचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरव करणारा दिवस मानला जातो. शासकीय कार्यालये, पोलीस ठाणे, शाळा-महाविद्यालये तसेच राष्ट्रीयकृत बँकांमध्ये या दिवशी ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्याची परंपरा आहे. मात्र केनवड येथील एसबीआय शाखेत सकाळी ना ध्वजारोहण झाले, ना शाखाधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित दिसून आले. बँक परिसर ओस पडलेला असून तिरंग्याचा साधा सन्मानही करण्यात आला नाही. सकाळपासून अनेक नागरिक बँकेसमोर ये-जा करत होते. मात्र कुठेही राष्ट्रध्वज, सजावट किंवा कार्यक्रमाची कोणतीही तयारी दिसून आली नाही. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. 'राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखाधिकाऱ्यांनीच जर राष्ट्रीय सणाला कवडीमोल किंमत दिली, तर देशभक्तीचे धडे कोण देणार?' असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. काही ज्येष्ठ नागरिकांनी या प्रकाराला 'राष्ट्रीय भावनांची अवहेलना' असे संबोधले आहे. या घटनेला आणखी गंभीर बनवणारी बाब म्हणजे, केनवड येथील एसबीआय शाखेत यापूर्वी १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीही ध्वजारोहण न झाल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे हा प्रकार एखाद्या दिवसापुरता मर्यादित नसून राष्ट्रीय सणांकडे सातत्याने होणाऱ्या दुर्लक्षाचेच द्योतक असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दरम्यान, या संदर्भात शाखा प्रशासनाशी संपर्क साधला असता 'सुरक्षा रक्षक (गार्ड) उपलब्ध नाहीत, तसेच शाखेत केवळ तीन कर्मचारी असल्याने सुरक्षा कारणास्तव २६ जानेवारीला ध्वजारोहण करता आले नाही,' अशी प्रतिक्रिया देण्यात आली. मात्र गार्ड नसणे किंवा मनुष्यबळ कमी असणे ही कारणे राष्ट्रीय सण टाळण्यासाठी ग्राह्य धरता येतील का, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. अनेक शाळा, ग्रामपंचायती व अल्प मनुष्यबळातील निमशासकीय कार्यालये साध्या पद्धतीने ध्वजारोहण करतात, हे वास्तव असताना राष्ट्रीयकृत बँकेचा हा बहाणा नागरिकांना अजिबात पटलेला नाही. या प्रकारामुळे आता एसबीआयच्या वरिष्ठ प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी, संबंधित शाखाधिकाऱ्यांकडून खुलासा मागवावा आणि राष्ट्रीय सणाची अवहेलना करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अशी जोरदार मागणी केनवड परिसरातून होत आहे. राष्ट्रीय सणांचे पालन करणे हे प्रत्येक शासकीय व राष्ट्रीयकृत संस्थेचे नैतिक व प्रशासकीय कर्तव्य असून भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, अशी ठाम अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.




## जनतेशी थेट संवाद, विकासाभिमुख धोरणांना दिशा देणारा
# कुटूंब प्रमुख हरपला - कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**रा**ज्याचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, माझे मार्गदर्शक आणि कुटूंबप्रमुख असलेले अजित पवार यांच्या अपघाती निधनाची बातमी माझ्यासाठी असह्य वेदना देणारी आहे. आज महाराष्ट्राने केवळ एक अनुभवी नेता नाही, तर जनतेशी थेट संवाद साधणारा, विकासालाच आपला धर्म मानणारा एक कर्तव्यदक्ष लोकनेता गमावला आहे. ही वेदना कुटुंबातली आहेष्ठआणि हे दुःख शब्दांच्या पलीकडचं आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. पवार कुटुंबीयांना आणि आम्हा सर्वांना हे दुःख सहन करण्याची ताकद देवो, अशा शब्दात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी भावपूर्ण श्रध्दांजली व्यक्त केली.



व्यक्त व्हायला शब्द अपुरे पडत आहेत. एखादा नेता नाही, तर घरातला माणूस हरपल्यासारखं वाटत आहे. अजितदादा पवार म्हणजे आमच्यासाठी केवळ नेतेच नव्हते तर ते आधार होते, मार्गदर्शक होते, कठीण वेळी पाठीशी उभं राहणारं कुटुंबातलं माणूस होते. आज त्यांच्या जाण्याने मनात जी पोकळी निर्माण झाली आहे, ती शब्दांत मांडणं कठीण आहे. नेहमी धीर देणारा, 'मी आहे' असं सांगणारा आवाज आज कायमचा शांत झाला आहे. अजितदादांचे जाणं ही माझ्या वैयक्तिक आयुष्यातील फार मोठी हानी आहे. माझ्या सामाजिक आणि राजकीय जीवनाची सुरुवातच अजितदादांच्या सहवासातून झाली. त्यामुळे माझ्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर दादांचा आधार, मार्गदर्शन आणि आशीर्वाद मला लाभला. माझ्यासारख्या हजारो कार्यकर्त्यांना त्यांनी उभं केलं, घडवलं, विश्वास दिला. कार्यकर्त्यापासून जिल्हा परिषद सदस्य, अध्यक्ष, आमदार आणि तीन वेळा मंत्री होण्यापर्यंतचा माझा प्रवास दादांच्या पाठबळामुळेच शक्य झाला. गेल्या चार दशकांत त्यांनी लाखो कार्यकर्त्यांना ताकद दिली. अजितदादांनी कधीही जातीपातीचं राजकारण केलं नाही. फक्त विकास आणि सर्वसामान्य माणूस हे त्यांचं व्हिजन नेहमी स्पष्ट होतं. रोखठोक, स्पष्ट राहून हीच विकासाची भूमिका घेत अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी सामान्य नागरिकांसाठी काम केलं. महाराष्ट्राच्या आणि सर्वसामान्यांसाठी विकासासाठी पहाटे ५ वाजल्यापासून कामाला सुरुवात करुन रात्री ऊशीरापर्यंत हा नेता धावत होता. आजही विश्वास बसत नाही की अजितदादा आपल्यात नाहीत. आज बारामती तालुक्यात त्यांच्या जाहीर सभा नियोजित होत्या. मुंबईहून बारामतीकडे येत असताना विमानाच्या लँडिंगदरम्यान झालेल्या दुर्दैवी अपघातात त्यांचे निधन झाले, ही घटना मनाला खोलवर हादरवून टाकणारी आहे. अजितदादांसोबतच्या असंख्य आठवणी आजही डोळ्यांसमोर तरळत आहेत. पिंपरी-चिंचवड आणि बारामतीसारखी रोल मॉडेल शहरं उभारताना त्यांनी विकासाची एक वेगळीच दिशा दिली. महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक सहा वेळा उपमुख्यमंत्री पद भूषवण्याचा विक्रम त्यांनी नोंदवला होता. त्यांनी आतापर्यंत महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सर्वाधिक ११ वेळा मांडला. यासोबतच सिंचन, ऊर्जा आणि वित्त अशा महत्त्वाच्या खात्यांचा कार्यभार सांभाळताना सर्वोत्तम कामगिरी केली होती. असंख्य संस्था, शासकीय इमारती आणि विकासकामांमधून त्यांची दूरदृष्टी कायम जिवंत राहणार आहे. दादा आज आपल्यात नसले, तरी प्रत्येक विकासकामाकडे पाहताना त्यांची आठवण आल्याशिवाय राहणार नाही. आपल्यासोबत असणारा, प्रेरणा देणारा, कामातून नेतृत्व शिकवणारा सहकारी गमावणं म्हणजे आयुष्यात निर्माण झालेली प्रचंड पोकळी आहे. प्रभावी, कणखर आणि निर्णायक नेतृत्व म्हणून अजित पवार यांची ओळख होती. त्यांच्या सोबत काम करणं म्हणजे राजकारणात शिकण्याचा एक अखंड प्रवास होता. अविरत कामात स्वतःला झोकून देत लोकांची कामं करण्याचा त्यांचा हातखंडा होता. मातीतील माणसाशी जोडलेला हा लोकनेता आज आपल्यातून निघून गेला आहे, ही कल्पनाच असह्य आहे. हा शोकसंदेश लिहिताना अंतःकरणात अपार वेदना होत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. राज्यातील गोरगरीब, तळागाळातील जनतेसाठी झटणारा नेता आज महाराष्ट्राने गमावला आहे.

या दुःखद घटनेने पवार कुटुंबीयांवर आलेल्या आघातातून त्यांना सावरण्याची शक्ती मिळो, हीच प्रार्थना करतो. या महान लोकनेत्याला मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

**दत्तात्रय भरणे**
कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य




# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






## विविध स्पर्धांतील विजेते पुढीलप्रमाणे

**तिळाच्या पदार्थांची स्पर्धा** - लि. ज्योतीजी चरखा (वाशिम), लि. नम्रताजी अग्रवाल (अकोला), सुलेखाजी पावली (परभणी).

**पतंग डेकोरेशन स्पर्धा** - लि. श्रद्धाजी जोशी, लि. प्रेमाजी मुंदडा, लि. ममताजी राठी.

**तोरण बनवा स्पर्धा** - लि. श्रद्धाजी जोशी, लि. नम्रताजी अग्रवाल, लि. सुनीताजी शर्मा, लि. निशाजी चांडक.

# लिनेस कल्पनाजी देशमुख यांनी स्वीकारली प्रांताध्यक्ष पदाची धुरा !

## ‘एक साथ, एक लक्ष्य – उज्ज्वल समाज का निर्माण’ ‘कल्पवृक्ष’ प्रांतीय पदग्रहण सोहळा अकोल्यात दिमाखात संपन्न



“ऑल इंडिया लिनेस क्लब्स, डिस्ट्रिक्ट एमएच-५ हिरकणीच्या वतीने वर्ष २०२६ चा प्रांतीय पदग्रहण समारंभ ‘कल्पवृक्ष’ स्थानिक शुभकर्ता लॉन्स येथे अत्यंत ओजस्वी आणि गरिमामय वातावरणात पार पडला. ‘एक साथ, एक लक्ष्य - उज्ज्वल समाज का निर्माण’ हा मंत्र जपत, नवनियुक्त प्रांताध्यक्षा लिनेस कल्पनाजी देशमुख यांनी आपल्या पदाची सूत्रे हाती घेतली. आपल्या ओघवत्या स्वीकृती भाषणात प्रांताध्यक्षा कल्पनाजी देशमुख यांनी महिला सशक्तीकरण, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्य या पंचसूत्रीचा संकल्प सोडला. ‘लिनेस क्लब हे केवळ संघटन नसून ते समाजाप्रती असलेल्या संवेदनशीलतेचे मूर्त रूप आहे,’ अशा शब्दांत त्यांनी आपला सेवाभावी दृष्टिकोन स्पष्ट केला. समारंभादरम्यान नियमावली ‘सार्थक’ आणि डिरेक्टरी ‘संकल्पना’ यांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते शास्त्रोक्त पद्धतीने करण्यात आले. विविध स्पर्धांमधून लिनेस भगिनींच्या सुप्त गुणांना आणि कल्पकतेला वाव मिळाला, ज्यामुळे कार्यक्रमात एक वेगळीच चैतन्यशक्ती संचारली होती.”



प्रतिनिधी २९ जानेवारी

**अकोला:** ऑल इंडिया लिनेस क्लब्स, डिस्ट्रिक्ट एमएच-५ हिरकणी, मल्टीपल चतुर्भुजा वर्ष २०२६ चा प्रांतीय पदग्रहण समारंभ कल्पवृक्ष हा स्थानिक शुभकर्ता लॉन्स, अकोला येथे रविवार, २५ जानेवारी रोजी अतिशय उत्साहपूर्ण व गरिमामय वातावरणात संपन्न झाले. या पदग्रहण समारंभाचे आयोजन लिनेस क्लब, अकोला यांनी केले होते.

कल्पवृक्ष या प्रांतीय पदग्रहण सोहळयाचे उद्घाटिका म्हणून ऑल इंडिया लिनेस क्लब पॅटर्न लिनेस इंदुजी मेहता, शपथविधी अधिकारी ऑल इंडिया लिनेस क्लब फाउंडर प्रेसिडेंट लिनेस मंजिरीजी कुलकर्णी, प्रमुख पाहुण्या नवनिर्वाचित बहुप्रांताध्यक्षा लिनेस अलकाजी डोंगरे, माजी बहुप्रांताध्यक्षा लि. सुनिलाजी नरप्पनवार, लि. कुमकुमजी वर्मा, प्रांताध्यक्षा लि. साधनाजी पळसकर, सचिव लि. सुवर्णा महाजन उपस्थित होते.

डिस्ट्रिक्टमधील तिन्ही रिजन-रिजन १ च्या लि. ममताजी सूर्य, रिजन २ च्या सुनंदाजी कुलकर्णी, रिजन ३ च्या डॉ. राखीजी अग्रवाल, कॅबिनेट ऑफिसर्स व सर्व पदाधिकाऱ्यांना शपथ देण्यात आली. सभेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. गणेश वंदना, संस्कृती ग्रुपची प्रस्तुती, ध्वजवंदना - लि. रत्नमालाजी रुईकर, स्वागतगीत - लि. रचनाजी खंडेलवाल, लिनेस प्रार्थना - लि. आशाजी पटेल यांनी सादर केली. शपथविधी अधिकाऱ्यांचा परिचय लि. सुनंदाजी गुप्ता यांनी तर लि. इंदुजी मेहता यांचा परिचय लि. स्वातीजी झुनझुनवाला यांनी करून दिला. बहारदार सूत्रसंचालन लि. राजश्रीजी देशमुख यांनी केले. ऋतुजाजी ॲन्ड ग्रुपने स्वागत नृत्य सादर केले.



‘कल्पवृक्ष’ समारंभात पदग्रहणासोबतच कॅबिनेट मीटिंग, पी.एस.टी. सेमिनार व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. नियमावली ‘सार्थक’, लिनेस डायरेक्टरी ‘संकल्पना’ तसेच लिनेस पिनचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. डायरेक्टरी एडिटर लि. अनिताजी उपाध्याय व लि. अरुंधतीजी सिरसाट उपस्थित होत्या. या समारंभात किट वितरण व कॅबिनेट फीसचे काम लि. उमाजी बाजोरिया, लि. सुलेखाजी गुप्ता, लि. प्रेमाजी मुंदडा यांनी पाहिले. हळदीकुंकू वाणाचे कार्यभार लि. राजश्रीजी समनपुरे, लि. अलकाजी उमाळे, लि. इंद्रायणीजी देशमुख, लि. निताजी अग्रवाल यांनी सांभाळले.



मार्गदर्शक म्हणून माजी प्रांताध्यक्षा लि. हरविंदर कौरजी सेठी, लि. उषाजी बाहेती, लि. डॉ. ताराजी माहेश्वरी, लि. आशाजी विरवानी, लि. सुनंदाजी गुप्ता, लि. स्वातिजी झुनझुनवाला, लि. लताजी बनवट, लि. बिनाजी चावला, लि. भारतीजी वर्मा, लि. तेजलजी चौधरी, लि. आशाजी वळवी, लि. कंचनजी शाह, लि. अपर्णाजी बावस्कर, उपप्रांताध्यक्षा लि. सुलभाजी देशपांडे यांची गरिमामयी उपस्थिती लाभली. बाहेरगावाहून आलेले सर्व क्लब सदस्य, पदाधिकारी, कॅबिनेट ऑफिसर्स, रिजन चेअरपर्सन्स आणि लिनेस भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या प्रसंगी प्रांताध्यक्षा पदावर लिनेस कल्पनाजी देशमुख, सचिव लि. रिंकुजी खंडेलवाल, कोषाध्यक्षा लि. शीतलजी अग्रवाल यांनी आपला पदभार स्वीकारला.









या प्रसंगी पी.एस.टी. प्रशिक्षण मान्यवरांनी दिले. प्रांताध्यक्षा यांनी आपल्या स्वीकृती भाषणात पाच सूत्रांवर-महिला सशक्तीकरण, आरोग्य तपासणी, शिक्षण प्रोत्साहन, पर्यावरण संरक्षण व सामुदायिक सेवा-भर देत सांगितले की लिनेस क्लब हा केवळ एक संघटन नसून सेवा व संवेदनशीलतेचे प्रतीक आहे. प्रत्येक सदस्याला सेवेशी जोडणे आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचवणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. या समारंभात परभणी, शिरपूर, अकोला, खामगाव, अंबेजोगाई, नंदुरबार, भुसावळ, अमळनेर, मंगरूळपीर, मानोरा येथील माजी अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, कॅबिनेट ऑफिसर्स व असंख्य लिनेस भगिनी उपस्थित होत्या. सर्वांनी शुभेच्छा देत यशस्वी कार्यकाळाच्या कामना केल्या. नवीन प्रांताध्यक्षांच्या नेतृत्वाखाली लिनेस नवे आयाम प्रस्थापित करेल, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले.

हा समारंभ यशस्वी करण्यासाठी लि. उमाजी बाजोरिया, लि. सुलेखाजी गुप्ता, अकोला क्लब अध्यक्षा लि. राजश्रीजी समनपुरे, लि. अलकाजी उमाळे, लि. इंद्रायणीजी देशमुख, लि. रत्नमालाजी रुईकर, लि. शीतलजी अग्रवाल, लि. रिंकुजी खंडेलवाल, लि. प्रेमाजी मुंदडा, लि. नीलाजी अग्रवाल, लि. सुनंदाजी गुप्ता, लि. स्वातीजी झुनझुनवाला, लि. राजश्रीजी देशमुख, लि. दिव्याजी देशमुख या लिनेस भगिनींनी अथक परिश्रम घेतले. नवनिर्वाचित प्रांताध्यक्षा यांनी सर्वांचे आभार मानले. तसेच मार्गदर्शक असलेल्या माजी प्रांताध्यक्षांचेही विशेष आभार व्यक्त केले. विशेषतः लि. सुनंदाजी गुप्ता यांनी अत्यंत मोलाचे सहकार्य केल्याचे नमूद करण्यात आले.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK